PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 2

# जागतिक प्रबोधनात ख्रिस्ती उपदेशकारनाची भूमिका

वळवी विश्वास गोरखनाथ
संशोधक विध्यार्थी
सामाजिक शास्त्रे प्रशाळा, इतिहास विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव (महाराष्ट्र) भारत

**प्रस्तावना:-**

प्रबोधन हे वैचारिक आणि बोद्धिक कृत्याचाद्वारे होणारे परिवर्तन आहे.आणि या परीवर्तनामागे महत्वाचा इतिहास दडलेला असतो.प्रबोधनाचा माध्यमातून आज जगात अनेक क्रांत्या घडून आलेल्या आहे.समाजाच्या बंदिस्थ गुलामगिरीतून आणि जातीसंस्था तसेच आर्थिक पिळवणूकीतुन मुक्त करण्यासाठी हा वैचारिक लढा सर्वप्रथम युरोपात लढला गेला.प्राचीन काळापासून समाजाचा सुधारणेसाठी आणि व्यवस्थेसाठी राजकीय क्षेत्राबरोबर विज्ञानाने देखील यात महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.सोळाव्या शतकात मार्टिन लुथर याने संत ऑगस्टीन यांचे द सिटी ऑफ गोड आणि बायबल मधील वचन ‘धर्मी मनुष्य विश्वासाने जगेल’ या वाचनाने प्रेरित होऊन हजार वर्षापासून पोपच्या आर्थिक गुलामगिरीत जकळलेल्या युरोपियन जनतेला आधात्मिक प्रबोधनाच्या माध्यमातून मुक्त केले.आणि संपूर्ण जगात प्रबोधनाची सुरुवात झाली.फ्रान्सिस बेकन याने तर विज्ञान आणि धर्म हे एकमेकांना कसे पूरक आहे हे दाखवून दिले.गलिलिओ कोपर्निकस,न्यूटन,अल्बर्ट आईन्स्टाईन,यांनी विज्ञाणात तर,जीन जैक रुसो,कार्ल मार्क्स,लीयोपाल्ड रंके,मोन्तेस्क्यू,दिडेरो ,यांनी वैचारिक घटकात प्रबोधन घडवून आणले.त्यामुळे फ्रेंच,रशियन आणि विकसनशील देशात राष्ट्रवादी क्रांत्या घडून आल्या.तसेच ख्रिस्ती प्रबोधनकारांनमध्ये मार्टिन ल्युथर.जोनाथन एडवर्ड,जॉर्ज वाईटफिल्ड,जॉन कॅल्विन,जॉन हस,आणि जॉन बनियान,यांनी प्रबोधनाची आध्यात्मिक सुरुवात करून इतिहासात एका नव्या अध्यायाची सुरुवात केली.तसेच आध्यत्मिक प्रबोधन म्हणजे काय,ख्रिस्ती प्रबोधनकारांनी प्रबोधन कसे घडवून आणले,प्रबोधनाचे चर्चवरील परिणाम,या घटकांचा इतिहास संशोधकाने या शोधनिबंधाच्या माध्यमातून प्रस्तुत केलेले आहे.

**२) संशोधनाचे विवेचन:-**

‘’All people are born sinners Sin without salvation will send a person to hell .All people can be saved if they confess their sins to God, seek forgiveness and accept God’s grace.All people can have a direct and emotional connection with God’’Religion shouldn’t be formal and institutionalized, but rather casual and personal’’१ प्रबोधन काय आहे?ज्या माद्यमातून वैचारिक आणि सुधारणात्मक क्रांती घडून येते.जिचे परिणाम इतिहासात कालबद्ध होऊन,संपूर्ण मानवजातीला प्रेरित करत असते,प्रबोधन काय आहे?ज्यामुळे इतिहासाचे काटे अनेक क्रांत्या,सुधारणा,आणि नवीन प्रवाहांना फिरवून आपल्या बाजूला करत असते,हे प्रबोधन इतिहासाच्या प्रत्येक अंगात असून,संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आहे.ख्रिस्ती धर्मातील अनेक बुद्धिवादी वर्ग,पाळक,शिक्षक,बिशप,आणि साहित्यिक,यांनी आध्यात्मिक प्रबोधनाच्या माध्यमातून युरोपात महत्वपूर्ण बदल घडवून आणले.

**३) संशोधन पध्दती:-**

संशोधकाने आपल्या ‘’जागतिक प्रबोधनात ख्रिस्ती उपदेशकारांची भूमिका’’या शोधनिबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला असून,ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

**४) संशोधनाची उदिष्ट:-**

**1)** पवित्र बायबल आणि ख्रिस्ती धर्म तत्वाचा माध्यमातून युरोपात आध्यात्मिक प्रबोधन घडून आले आणि मग प्रबोधनाचे वारे संपूर्ण युरोपात वाहू लागले.
२) प्रबोधनामुळे सामान्य मनुष्याला स्वतंत्र वैचारिक बुद्धी प्राप्त झाली.
३) प्रबोधनामुळे वैज्ञानिक क्षेत्रात महत्पूर्ण बदल घडून आले.धर्माचे(पोपच्या विचारांचे) बंदिस्थ क्षेत्र तोडून विज्ञाणाने प्रगती घडवून आणली.
४) युरोपातील वर्ग हा ख्रिस्ती धर्मातील दोन पंथ कॅथोलिक आणि प्रोटेस्तट यांचा विचारसरणीवर चालणारा असल्याकारणाने,वैचारिक द्वधातून प्रबोधन घडून आले’
५) सुरुवातीचे सर्वच प्रबोधनकार ख्रिस्ती होते,उदा,मार्टिन ल्युथर.जोनाथन एडवर्ड,जॉर्ज वाईटफिल्ड,जॉन कॅल्विन,जॉन हस,आणि जॉन बनियान,आध्यात्मिक प्रबोधनातून,संपूर्ण युरोपात आणि जगात सुधारणाचे वारे वाहू लागले आणि हे कळस ख्रिस्ती मिशनऱ्यानी आधुनिक काळात पूर्णत्वास नेले.

**५) प्रबोधन म्हणजे काय :-**

''प्रबोधन म्हणजे पुनरुज्जीवन,पुनरुन्थान,पुनजागृती व उदयकाल होय.आधुनिक युगाचा प्रारंभ होणाऱ्या कालखंडास प्रबोधन (Renaissance) असे नाव आहे.मानवाने हे प्रबोधन ज्ञान,विज्ञान,कला व धर्म या क्षेत्रात केले आहे.प्राचीन ग्रीक व रोमन काळात साहित्य,स्थापत्य,इतिहास,कला,तत्वज्ञान,स्थिर व सुखी जीवनाची साधने यासंबंधी ज्ञानाने मानवाने भरपूर प्रगती केली होती.परन्तु मध्ययुगाच्या पुवार्धात सरंजामशाही,धर्मभोळेपणा पोप व धर्मगुरुंचे वाढते प्रस्थ आणि त्यामुळे प्रस्थापित परंपरेविरुद्ध आवाज काढणाऱ्याचा होणारा छळ किवा त्या भीतीमुळे बंडखोरांचा दबलेला आवाज यामुळे हे ज्ञान लुप्तप्राय होत चालले होते.ते ज्या काळात अनेक कारणामुळे पुनरुज्जीवित झाले.त्यास पुनरुज्जीवनाचा काळ असे म्हणतात.केवळ पुनरुज्जीवन म्हणजे प्रबोधन नाही.विस्मृतीप्राय ग्रंथाचा आणि कृतीचा पुनराभ्यास आणि अनुकरण हे पुनरुज्जीवन होय.प्राचीन विचारवंतांच्या ज्ञानाचा शोध घेण्याचे प्रयत्न समोर ठेवून बदललेल्या काळाच्या अनुषंगाने पुढे पाउल टाकण्याची धडपड म्हणजे प्रबोधन होय.प्रबोधनाची ही प्रक्रिया एकदम झाली नाही.बाराव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंत ती सुरु होती.पंधराव्या शतकात पश्चिम युरोपमध्ये म्हणजेच इटली,फ्रांस,व ब्रिटेन या देशात सर्वप्रथम आणि त्यानंतर उर्वरित युरोपमध्ये वैचारिक प्रबोधन(वैचारिक परिवर्तन किवा उत्क्रांती) झाले.त्यास विद्येचे प्रबोधन असेही म्हटले जाते.ज्या काळात प्रबोधन घडून आले.त्या काळास प्रबोधन युग या नावाने ओळखण्यात येते.''२.प्रबोधन हे मनुष्यातील सदसदविवेकबुद्धीला जागृत करून असत्याला विरोध करते,हा सद्सद्विवेक,कला,धर्म,संस्कृती,भाषा,साहित्य यांच्या माध्यमातून जागृत होत असतो,पण जागतिक प्रबोधनाचा काळात या सर्वच घटकांवर ख्रिस्ती उपदेशकाचा आणि पवित्र बायबलचा मोठा प्रभाव होता.आणि याच परिणामात युरोपातील अंधारयुग नाहीसे झाले,ज्या घटनेला पुढे धर्मसुधारणा म्हटले गेले.

**६ ) ख्रिस्ती धर्मतत्वांचा दृष्टीकोनातून प्रबोधन म्हणजे काय:-**

प्रबोधन काय याच्या उहापोह करतांना जयंत लेले म्हणतात ''खरे तर पाचव्या शतकामध्ये सर्वप्रथम प्रबोधनाच्या असा विचारवंताना हे जाणवले कि ते आता आधुनिक/मोडर्न होत आहेत-येथे लक्षात घेतले पाहिजे कि ह्या लेखकाने मोडर्न असा जो शब्द लाटिन भाषेत वापरला आणि त्यातून असे तथ्य सांगितले कि,पश्चिम युरोप हा पारंपारिक पेगन आणि रोमन समाजापासून विभक्त होऊन स्थानबदल(shift) घडवून मोठ्या प्रमाणात ख्रिस्ती झाला,तेव्हा तो आधुनिक होऊ लागला.म्हजे या लेखकाच्या मते,ख्रिस्तपूर्व काळापासून ख्रिस्ताच्या कालखंडापर्यंत जो काही बदल झाला वा स्थानाबद्दल झाला तो म्हणजेच

आधुनिकतेकडे झालेला बदल होता.म्हणजे येथे लक्षात येते कि त्या काळात ख्रिस्ती होणे म्हणजे आधुनिक होणे असे ठरले,त्यानंतर पुन्हा एकदा १२ व्या शतकात लोकांनी स्वताला मोडर्न अथवा आधुनिक मानले कारण त्या काळात चार्ल्स द ग्रेंट ह्याच्या राजवटी अंतर्गत ख्रिस्ती धर्म व्यापक क्षेत्रामध्ये पसरला.पुन्हा एकदा आधुनिक होण्याची भाषा आपण ऐकतो ती प्रबोधनाच्या काळात प्रबोधन म्हणजे एनलायमेंट"३ हे प्रबोधन होत असतांना ख्रिस्ती धर्माची व्याख्या आपल्या अनेक प्रवाहातून नवीन प्रवाहात वाहताना दिसून येते,या प्रबोधनातून ख्रिस्ती धर्म हा पुन्हा नव्या जोरात प्रवाहित होऊ लागला,आणि आधुमिक मिशनरी चळवळीच्या गतीला कारणीभूत ठरला,सामान्य मनुष्य नवीन विचारांचा आणि शोधांचा तारकांत गुंग झाला ज्यामुळे प्रबोधनाला गती प्राप्त झाली.

''The intellectual basis of the Renaissance was its version of humanism, derived from the concept of Roman *Humanitas* and the rediscovery of classical Greek philosophy, such as that of Protagoras, who said that "Man is the measure of all things." This new thinking became manifest in art, architecture, politics, science and literature. Early examples were the development of perspective in oil painting and the recycled knowledge of how to make concrete. Although the invention of metal movable type sped the dissemination of ideas from the later 15th century, the changes of the Renaissance were not uniformly experienced across Europe: the very first traces appear in Italy as early as the late 13th century, in particular with the writings of Dante and the paintings of Giotto'' प्रबोधनामुळे संपूर्ण युरोपात सामाजिक,आर्थिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात अनेक बदल घडून आले.हे बदल स्वातंत्र्याचे होते सामाजिक मूल्य जपणारे होते.

| अनु. | प्रबोधनात:-ख्रिस्ती धर्म तत्वे | प्रबोधनात:-साहित्यकर | प्रबोधनात:-ख्रिस्ती उपदेशकार | जागतिक प्रबोधनाची:-माध्यमे |
|---|---|---|---|---|
| १ | पवित्र बायबल | जीन जैक रुसो | मार्टिन लुथर,जॉन कॅल्विन, | धर्म |
| २ | ९५ थेसिस. | व्होल्टअर | जॉन इलियट, | कला |
| ३ | The City of God. | डीदेरो | जॉन नोक्स | भाषा |
| ४ | पवित्र शास्त्राचे सत्य स्पष्टीकरण. | मोनटेस्कयु | जॉर्ज फोक्स | संस्कृती |
| ५ | ख्रिस्ती धर्म तत्वांची साहित्यनिर्मिती. | रोबर्ट विलिगटन | विलियम टीन्डले, | साहित्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | पवित्र बायबलच्या वेगवेगळ्या भाषेत भाषांतरे. | पेड्रो मेक्सिआ | जॉन बनियान | सद्सदविवेकबुद्धी |
| ७ | प्रेषितिय मंडळीची पुनर्स्थापना. | लेडी मेरी रोथ | एग्रेसियस लोयोला, | सत्य,अहिंसा,ज्ञान,विज्ञान |

**७) ख्रिस्ती विचारसरणीतून प्रबोधनाची सुरुवात:-**

प्रबोधन सुरु होण्याआधी युरोप आपल्या अंधारयुगात होता आणि हजार वर्षे या अंधारातून प्रवास करतांना कुठेतरी तो सूर्याच्या छोट्या किरणांची वाट पाहत होता,हे जीवनाचे आणि स्वातंत्र्याचे महत्वपूर्ण किरणे आपल्या प्रकाश वर्षातून आणले ते म्हणजे मार्टिन ल्युथर याने,नदीच्या पाण्याला अमृताचे कण बनविले ते म्हणजे मार्टिन लुथर याने,वैचारिक गुलामगिरीतून मुक्त केले ते म्हणजे मार्टिन लुथर याने ‘’The Great Awakening was a religious revival that impacted the English colonies in America during the 1730s and 1740s. The movement came at a time when the idea of secular rationalism was being emphasized, and passion for religion had grown stale. Christian leaders often traveled from town to town, preaching about the gospel, emphasizing salvation from sins and promoting enthusiasm for Christianity. The result was a renewed dedication toward religion.Many historians believe the Great Awakening had a lasting impact on various Christian denominations and American culture at large.In the 1700s, a European philosophical movement known as the Enlightenment or the Age of Reason, was making its way across the Atlantic Ocean to the American colonies. Enlightenment thinkers emphasized a scientific and logical view of the world, while downplaying religion.In many ways, religion was becoming more formal and less personal during this time, which led to low church attendance.Christians were feeling complacent with their methods of worship, and some were disillusioned with how wealth and rationalism were dominating culture. Many began to crave a return to religious piety.Around this time, the 13 colonies were religiously divided. Most of New England belonged to congregational churches.The Middle colonies were made up of Quakers, Anglicans, Lutherans, Baptists, Presbyterians, the Dutch Reformed and Congregational followers.Southern colonies were mostly members of the Anglican church, but there were also many Baptists, Presbyterians and Quakers.The stage was set for a renewal of faith, and in the late 1720s, a revival began to take root as preachers altered their messages and

reemphasized concepts of Calvinism.(Calvinism is a theology that was introduced by John Calvin in the 16th century that stressed the importance of scripture,faith, predestination and the grace of God.)''५.

ख्रिस्ती उपदेशकारांनी खऱ्या अर्थाने प्रबोधनाची सुरुवात केली,काहींनी आपल्या प्राणाची आहुती दिली,ख्रिस्ती प्रबोधनकरांनी ख्रिस्ताचा आणि पवित्र बायबलचा माध्यमातून हे प्रबोधन घडवून आणले,ज्यात चर्चमध्ये होणाऱ्या वाईट प्रथांच्या विरोध करून बंड करण्यात आले.''माणसांनी प्रगती करण्यासाठी ख्रिस्ती धर्मग्रंथ त्यांना काय सांगत आहेत तेच शिकायचे असा दंडक होता.हे धर्मग्रंथ जे काही सांगत होते त्याचे पालन करायचे परन्तु तसे करतानाही थेटपणे करायचे नाही.म्हणजे धर्मग्रंथाचे अन्वयार्थ देवाचे दूत म्हणून लावण्याचा अधिकार पुन्हा एकदा फक्त काही मुठभरानाच होता.ईश्वराचे प्रतिनिधित्व चर्च करीत होते आणि चर्चचे प्रतिनिधित्व करणारा माणूस हा ईश्वराचा दूत होता.तसेच धर्मग्रंथ हे ईश्वराचे शब्द होते...ह्या सर्व गोष्टी अन्वयार्थ लावणाऱ्यांच्या माध्यमातून आल्या होत्या,ईश्वराकडून थेटपणे माणसापर्यंत आल्या नव्हत्या.म्हणजे आता परंपरा ही चर्चच्या भोवती केंद्रित होती.धर्मग्रंथांचा अन्वयार्थ चर्च लावत होते आणि चर्चची घडण वा संघटना ही मोठ्या प्रमाणात उतरंडीच्या स्वरुपाची होती.''६.मध्ययुगीन काळात युरोपात सर्व सत्ता पोपचा अधीन होती आणि,सामान्य माणसाला बायबल वाचण्याची परवानगी नव्हती,ती फक्त प्रिस्त आणि बिशप यांनाच होती,म्हणून सामान्य मनुष्य आणि सदस्य पिडला जात असे,जेव्हा मार्टिन लुथर यांने बायबल उघडले आणि तेव्हा जगात प्रबोधनाची सुरुवात झाली.कारण सामान्य मनुष्याला पोप आणि चर्चचे सर्व बंधने तोडून पवित्र बायबल वाचण्याचे नवीन मंच मार्टिन लुथर आणि अन्य ख्रिस्ती प्रबोधनकरांनी लावून दिले होते.

**८) जागतिक प्रबोधनासाठी ख्रिस्ती धर्मातील सर्वोच्च तत्वे (माध्यमे):-**

ख्रिस्ती प्रबोधनकारांनी सर्वप्रथम आपले हक्क जे चर्चने बंदिस्थ करून ठेवले होते.ते तोडायला सुरुवात केली,जॉन हस याला उगवत्या सूर्याचा तारा असे म्हटले जाते.याचे कारण प्रबोधन सुरु होण्याअगोदर त्याने,पोपच्या वाईट प्रथा आणि विचाराविरुद्ध बंड पुकारले होते आणि याचं बंडाचा ठिणगीतून प्रबोधनाचा विस्तव पेटला.जो पुढे अनेक ख्रिस्ती प्रबोधनकारांनी पुढे नेला,मार्टिन लुथरने ज्या प्रबोधनाची सुरुवात केली त्यात पवित्र बायबलची सर्वोच्च तत्वे आणि तसेच आपल्या ९५ थेसिस पोपच्या कार्याचे/प्रश्नाचे उत्तर म्हणून संशोधित करून रोमच्या मुख्य दरवाजावर खिळयांनी ठोकल्या.प्रबोधनासाठी या ९५ थेसिसचा वापर लुथरने पोपचा आणि चर्चचा वाईट प्रथा आणि विचाराविरुद्ध केला होता,पवित्र बायबलचे योग्य स्पष्टीकरण न करता सामान्य जनतेची आर्थिक पिळवणूक कशी केली जाईल त्या सोयीनुसार स्पष्टीकरण प्रिस्त आणि बिशप करू लागले,म्हणून लुथेरने सांगितले 'देव आणि मनुष्य यात फक्त ख्रिस्त येशूच मधस्थ्य आहे आणि

बायबल वाचण्याचा त्या प्रत्येक मनुष्याला अधिकार ज्याने ख्रिस्ताला स्वीकारले आहे.कारण प्रत्येक मनुष्य आपल्या ख्रिस्तावरील विश्वासाने जगेल.आणि विश्वास-आशा-प्रेम-पश्चाताप ही स्वतंत्र आहे आणि ती देवाकडून येते पोपकडून नाही'.असे योग्य प्रकटीकरण लुथर याने मांडले आणि संपूर्ण युरोपात प्रबोधनाचा आवाज पवित्रशास्त्रवचनाने आणि सदसदविवेकबुद्धी(पवित्र आत्मा) ने ऐकू येऊ लागला.

**९) काही महत्वाचे ख्रिस्ती उपदेशकार :-**

**१) मार्टिन लुथर:-**

मार्टिन लुथर याने धर्मसुधारणा घडवून आणली आपल्या ख्रिस्ती धर्मातील सुधारणावादी विचारांनी संपूर्ण युरोपला हादरून टाकले.पोप आणि चर्चच्या वाईट प्रथामुळे लोकांची होणारी आर्थिक पिळवणूक त्यांनी आपल्या प्रोटेस्तच्या जोरावर फोडून काढली.जर्मनी,अमेरिका,इंग्लंड,फ्रांस आणि अनेक युरोपियन देश त्यामुळे जागृत झाले.प्रबोधनाची मोठी लाट लुथरमुळे वाहू लागली,आणि धर्मसुधारणा चळवळीत अनेक पाळक बिशप यांनी भाग घेऊन जागतिक प्रबोधनाची सुरुवात केली.मार्टिन लुथेरने आपल्या ९५ संशोधित थेसिसच्या माध्यमातून पवित्र शास्त्राचे सत्य स्पष्टीकरण केले.आणि पोप आणि चर्च यांची खोट्या स्पष्टीकरणाची असत्य तत्वे जगासमोर मांडली,लुथरमुळे खऱ्या अर्थाने धर्मसुधारणेत ख्रिस्ती उपदेश्कारांची सख्या वाढली कारण हा सत्याच्या,पवित्र शास्त्राचा लढा होता,ज्यात देवानेच त्यांना प्रेरित केले होते.

**२) जोनाथन एडवर्ड:-**

जोनाथन एडवर्ड याने १७०३-१७५८ या काळात अमेरिकेत आपल्या ख्रिस्ती धर्मतत्वाने महत्वपूर्ण योगदान दिले,फ्रीडम ऑफ द विल या तत्त्वाखाली त्यांनी आपले कार्य जनसामान्य माणसापर्यंत पोहचविण्याचे काम केले.जॉर्ज वाईटफिल्ड कडून प्रेरणा घेत त्यांनी येल येथे कॉंग्रेसनल चर्चचे पाळक म्हणून शपथ घेतली पुढे त्याच्या सक्त अधिकाराखाली लोकांनी नाराजगी व्यक्त केली आणि त्यांनी सेवामुक्त होण्याच्या निर्णय घेतला.''Most historians consider Jonathan Edwards, a Northampton Anglican minister, one of the chief fathers of the Great Awakening.Edwards' message centered around the ideas that humans were sinners, God was an angry judge and individuals needed to ask for forgiveness. He also preached justification by faith alone.In 1741, Edwards gave an infamous and emotional sermon, entitled "Sinners in the Hands of an Angry God." News of the message spread quickly throughout the colonies.Edwards was known for his passion and energy. He generally preached in his home parish, unlike other revival preachers who traveled throughout the

colonies.Edwards is credited for inspiring hundreds of conversions, which he documented in a book, *Narratives of Surprising Conversions*.''७.

**३) जॉर्ज वाईटफिल्ड:-**

जॉर्ज वाईटफिल्ड यांचे ख्रिस्ती धर्मात परिवर्तन वयाच्या एकविसाव्या वर्षी झाले.१७३६ ला झालेल्या आपल्या चर्चच्या पहिल्याच भाषणात एकविस लोकांचे परिवर्तन झाल्याच्या मोठा आंनद त्यांना मिळाला,पुढे वेस्ली बंधुच्या सानिध्यात आल्याने त्यांनी चर्चचा बाहेर म्हणजे सकाळी पाच वाजेपासून अनेक नगरांचा शिवारात प्रचार करायला सुरुवात केली,आणि त्याच्या उपदेशांनी नवीन जागृत अमेरिका आणि इंग्लंड मध्ये घडवून आणली ''George Whitefield, a minister from Britain, had a significant impact during the Great Awakening. Whitefield toured the colonies up and down the Atlantic coast, preaching his message. In one year, Whitefield covered 5,000 miles in America and preached more than 350 times.His style was charismatic, theatrical and expressive. Whitefield would often shout the word of God and tremble during his sermons. People gathered by the thousands to hear him speak.Whitefield preached to common people,slaves and Native Americans. No one was out of reach. Even Benjamin Franklin, a religious skeptic, was captivated by Whitefield's sermons, and the two became friends.Whitefield's success convinced English colonists to join local churches and reenergized a once-waning Christian faith.''८.तसेच जॉन नोक्स,जॉन कॅल्विन,एग्रेसियस लोयोला,जॉन बनियान,विलियम टीन्डले,जॉर्ज फोक्स,जॉन इलियट,या ख्रिस्ती उपदेश्कारांनी जागतिक प्रबोधनात मोलाचे योगदान दिले.एकंदरीत प्रबोधनाची खरी सुरुवात ख्रिस्ती धर्म तत्वाच्या आणि बायबच्या माध्यमातून झाली.

जागतिक प्रबोधनात ख्रिस्ती धर्म तत्वाचे आणि पवित्र शास्त्राचे सत्य स्पष्टीकरण ख्रिस्ती उपदेशकारांनी केले.हे बंड पोप आणि चर्चच्या वाईट प्रथा आणि तत्वाविरुद्ध होते.ख्रिस्ती तत्वांच्या माध्यमातून युरोपाच्या सर्वच क्षेत्रात पुनरुज्जीवन घडून आले.लोकांना आपल्या हक्काची आणि कर्त्यव्याची जाणीव झाली,लोकांच्या आता अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि अंधश्रद्धाकडून विज्ञानाकडे वाटचाल सुरु झाली.निगमनाएवजी लोक विगमनाकडे वळू लागले,युरोपातील सामान्य वर्गाच्या प्रवास आता प्रबोधनाच्या खऱ्या जगात होऊ लागला.परिवर्तनाचे ही छोटी-छोटी सूर्याची किरणे ख्रिस्ती प्रबोधनाच्या माध्यमातून जगात आमुलाग्र बदल घडवून येत होती.आणि येत आहे.ज्या परिवर्तनाची मुळे ख्रिस्ती उपदेशकारचा विचारांशी दडलेली आहे.

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 2

## संदर्भग्रंथसूची:-

1) www.history.com/topics/british-history/greatawakening/ Date:20/03/2019/ Time :-3-9:PM
2) आधुनिक जगाचा इतिहास,डॉ अनिल कठारे,प्रशांत पाब्लीकेशन्स,जळगाव,प्रथम आवूर्ती २०१५, पृ क्र,१७-१८
3) पाश्च्यात विचारसरणीच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे,जयंत लेले,युनिक अकादमी प्रकाशक,प्रथम आवृत्ती २०१३,पुणे,पृ क्र १४-१५
4) (en.m.wikipedia.org/wiki/Renaissance/date:20/03/2019/time:2:52
5) www.history.com/topics/british-history/great-awakening/ Date: 20/03/2019/ Time:- 3-3:PM
6) पाश्च्यात विचारसरणीच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे,जयंत लेले,युनिक अकादमी प्रकाशक,प्रथम आवृत्ती २०१३,पुणे,पृ क्र-२३-२४
7) www.history.com/topics/british-history/great-awakening/ Date:20/03/2019/Time:-3-15:PM
८) www.history.com/topics/british-history/great awakening/ Date:20/03/2019/Time:-3-25:PM